# Sahaj Adhyayan (सहज अध्ययन)

जर हे Practice Question Papers तुम्हाला खरंच फायदेशीर वाटत असतील तर तुमच्या सर्व मित्र मैत्रिणींना पाठवा.

त्यांना देखील ह्या सर्वांचा अभ्यासासाठी फायदा होऊ द्या.

For more study material connect with us on

**Instagram**: www.instagram.com/sahajadhyayan

**YouTube (मराठी माध्यम):** www.youtube.com/sahajadhyayan

**YouTube (Semi/English):**

www.youtube.com/SahajAdhyayanSemiEnglish

**Telegram** (for PDF): t.me/sahajadhyayan

**Facebook**: www.facebook.com/sahajadhyayan

**WhatsApp** (only Message, No calls): **855 289 2890**

CƵǁ YƵǁŜ ăűdzŘè Yǀ·űŜǁʎǀ·ĩ ǁŜ∃ʎăűŜǁ KŜǁŜ
ǿǿǿ ɸăǀ·Kǀ·ʔǀ·ŘKèǀ·èǀ·yɸʎyĸǁŜ∃ʎăűŜǁ

**जर तुमच्या जवळ कोणत्याही इयत्तेच्या, कोणत्याही परीक्षेच्या, कोणत्याही विषयाचे, Question Papers असतील**

**तर ते आम्हाला WhatsApp वर पाठवा,**

**इतर विद्यार्थी मित्रांना त्या सर्वांचा उपयोग होईल.**

This Question paper shared by Jatin from Raigad Thanks Jatin.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.     Contact us: @SahajAdhyayan

इयत्ता ११ वी
वेळ २.३० तास

# प्रथम सत्र परीक्षा २०२१ - २२
## विषय - मराठी

गुण - ५०
पेजेस - ८

सूचना - १) सर्व कृती सोडविणे आवश्यक आहेत.
२) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

### विभाग- १ गद्य ( गुण १२ )

**कृती.१अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

आकृती पूर्ण करा.

१) अल्लाला व्यापारी झालेली - ______ २
मामूने कॉलेजात दाखल केलेला - ______

२) परीक्षा केंद्रातील काही कामे २
- ______
- ______
- ______

बदलत्या काळाची पावलं ओळखून मामूनं निर्धार बांधला. पोराला कॉलेजात दाखल केलं. परवा परवा मामूची बुढी आई अल्लाला प्यारी झाली. तिच्या आठवणी सांगताना मामूच्या डोळ्यांत पाणी तरळलं. 'दुनियेत सारं मिळेल सर; पण आईची माया कुणाकडनं न्हाई मिळायची,' हे त्याचे बोल ऐकताना नातवंड असलेला मामू मला त्याच्या शाबूसारखा पोर वयाचा वाटला. त्याची आई वारली त्या दिवशी शाळेला सुट्टी मिळाली.

हे हायस्कूल शंभर वर्षांवर जुनं आहे. इथलं रेकॉर्ड त्यामुळे अवाढव्य आहे. कुणी माजी विद्यार्थी येतो. १९२०-२२ सालातील आपल्या नावाचा दाखला मागतो. मामू ते रजिस्टर अचूक शोधून त्याचं नाव धुंडून काढतो. हाती दाखला पडलेला, बाप्या झालेला विद्यार्थी मामूचा हात हातात घेऊन म्हणतो, चलो मामू चाय लेंगे.

कशाला ? नगं आत्ताच घेतलाय. कुठं हाय आता तुम्ही ? मामू त्याचा चहा नाकारण्याचा प्रयत्न करतो. मनात जुन्या आठवणी रेंगाळणारा विद्यार्थी त्याचा हात खेचून त्याला आग्रहानं चहाला नेतो. मग चहा पिता पिता त्याच्या वेळच्या शिक्षकांच्या आठवणींना उजाळा मिळतो. एम. आर. सर भारी माणूस. केवढा आब होता त्या वक्ताला हायस्कूलचा. मामू हरवलेल्या काळाला मुठीत पकडण्याचा प्रयत्न करतो.

ही शाळा सरकारी आहे. इथं ड्रॉईंगच्या, कॉमर्सच्या सरकारी सर्टिफिकेटच्या परीक्षांचं केंद्र आहे. या परीक्षा आल्या, की बुढा मामू पाखरागत हालचाली करू लागतो. नंबर टाकणं, बाकडी हालवून बैठकीची व्यवस्था करणं, पाणी देण्यासाठी गोरगरिबांची पोरं ऑफिसात आणून दाखल करणं. पडेल ते काम मामू उत्साहानं करू लागतो.

कधी खेळताना, कधी प्रार्थनेच्या वेळेला एखादं पोरगं चक्कर येऊन कोसळतं. रिक्षा आणून, त्यात त्या पोराला घालून डॉक्टरांकडं नेताना मामू त्याला आईच्या मायेने धीर देत म्हणतो. "घाबरू नकोस. ताठ बस काय झालं न्हाई तुला."

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi
Scanned with CamScanner

सव्वीस जानेवारी, पंधरा ऑगस्ट या राष्ट्रीय दिवशी कधी कधी मामूच्या हातानं इथला राष्ट्रध्वज, दंडावर सरसरत चढतो. शाळेच्या तिसऱ्या मजल्यावरच्या माथ्यावर निकोप वाऱ्यावर फडफडत राहतो, फेट्याजवळ हाताचा पंजा भिडवून मामू राष्ट्रगीत संपेपर्यंत ध्वजाकडे मान उंचावून बघत राहतो.

माझ्याकडं कुणी बडा पाहुणा आला, की मामूकडं बघत नुसती मान डुलवली, की तिचा इशारा पकडत मामू चहाची ऑर्डर देतो. पाहुणा बसेपर्यंत चहा दाखल होतो. "राजे, चहा केव्हा सांगितलात?" पाहुणा आश्चर्यानं विचारतो. मी उत्तर देतो, "ऐतिहासिक काळात वावरतो ना सध्या ! नुसती इशारतीबरहुकूम कामं होतात आमची !"

एकदा मी आणि मामू शाळेच्या व्हरांड्यात बाकावर गप्पा मारत बसलो. त्या दिवशी मामू खुलला होता. संस्थानिकांच्या काळच्या, वाड्यावरच्या एक-एक अजब गमती सांगत होता. तीन तास केव्हा मागं पडले होते दोघांनाही कळलं नाही.

प्रसंगी मामू एखाद्या कार्यक्रमाच्या वेळी मुलांसमोर दहा-वीस मिनीटे एखाद्या विषयावर बोलू शकतो. त्याला जसं उर्दूचं ज्ञान आहे तसचं त्याला वैद्यकाचंही ज्ञान आहे. लहानसर चण असलेल्या शिक्षकाला तो म्हणतो, काय पवार सर, "काय ही तब्येत ? पैसं काय कोन उरावर बांधून नेणार जाताना ? जरा अंग धरीसारकं कायतरी खावा. मी सांगतो तुमाला. साखरेच्या पाकात तूप घालून त्यात त्यात शेरभर साफ धुतलेल्या खारका बिया काढून पंधरा दिस मुरतीला घाला. रोज सकाळी अनोशा पोटी दोन-दोन खावा. म्हयन्याभरात तुमाला कुनी वळखनार न्हाई! "

कुणाच्या पायाला लागलं तर त्यावर कुठला पाला वाटून लावावा याचा सल्ला द्यायला मामू विसरत नाही. कुणाचं पोट बिघडलं तर त्यावर कुठला काढा प्यावा याची सूचना द्यायला तो चुकत नाही.

शाळेत एकदा कार्यक्रम निघाला, की त्याची आखणी मामूच्या हातात येते. फ्लॉवरपॉटपासून टेबलक्लॉथपर्यंत सारी जुपी जोडून देऊन पुन्हा कार्यक्रमाच्या वेळी एखादा कोपरा धरून, वक्ता काय काय बोलतो हे तो नीट ध्यान देऊन ऐकतो. कार्यक्रम संपला, की मामूला विचारावं, कसा झाला कार्यक्रम ? वक्त्यात काही खास नसेल तर नाराजी प्रकट करण्याचीही त्याची एक ढब आहे. "बोललं चांगलं ते, पर म्हनावी तशी रंगत न्हाई भरली."

आणखी वर्षानंतर मामू या शाळेतून सेवानिवृत्त होणार. रोजाना दिसणारा त्याचा अबोली रंगाचा फेटा आणि सफेद दाढी आता दिसणार नाही. माणसाच्या आयुष्याला कुठं ना कुठं वळण असतं. टाळतो म्हटल्यानं ते नाही टाळता येत.

सरकारी नियमच आहे. त्याप्रमाणे मामूला घरी जावं लागणार; पण मला मात्र वाटत राहातं, की त्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्याच्या हातानं इथल्या थोराड घंटेचे घण् घण् घण् असे टोल पडत राहावेत. त्या टोलांच्या तालावर चैतन्याचे अगणित कोवळे कोंब नाचत राहावेत. जोडल्या हातांनी आणि मिटल्या डोळ्यांनी, कवळिकीच्या असंख्य अनघड कंठांतून प्रार्थनेचे धीरगंभीर बोल असेच उमटत राहावेत आणि दगडी खांबाला रेलून ते प्रार्थनाबोल ऐकताना बुढा, पार झालेला मामू असा कसल्यातरी विचारात कायमचा हरवलेला बघायला मिळावा.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

Scanned with CamScan

This Question paper shared by Jatin from Raigad Thanks Jatin.



३) मामूचे व्यक्तिमत्त्व कसे होते ते तुमच्या शब्दांमध्ये लिहा. २

४) माणसापेक्षा माणूसकी फार फार मोठी आहे, या विधानातील आशय सौंदर्य लिहा.

**ब) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** ४

खालील आकृती पूर्ण करा.

१) सृष्टीचे महान गान ऐकण्यासाठी → [ ] [ ] १

२) साहित्याचा आत्मा कशात आहे. → [ ] [ ] १

सृष्टीचे हे महान गान तुम्हाला एकदम ऐकू येणार नाही. सृष्टीशी परिचय वाढवा. तुम्हाला तिची अनंत भाषा, अनंत छंद - मग सारे कळू लागेल. जरा पहाटे उठत जा. बाहेर पडा. वारा अंगाला लागू दे. तृणपर्णे पाहा. तांबडे कसे काय फुटते ? प्रकाश कसा येतो, पाहा, जीवनास मंगल असे प्रात:स्नान होईल. अमेरिकन ग्रंथकार थोरो म्हणतो, "दोन तास शेतात काम करा. तुमची सारी पोटदुखी जाईल. तुमच्या लिहिण्यात तेज, तजेला, नवजीवन येईल." आज सृष्टीपासून आपली फारकत झाली आहे. तुम्ही अजून नवीन आहात ही चूक करू नका. जिज्ञासा, कौतुक वृत्ती यात साहित्याचा आत्मा आहे. प्रत्येक वस्तूजवळ जाणे, तिला बघणे, तिच्याजवळ बोलणे यातील गंमत तर पाहा, तुम्ही झपाट्याने वाढत जाल.

अशा रीतीने अनेक अनुभव घ्यावे. जीवन अनुभवाने समृद्ध करावे. सृष्टीच्या सानिध्यातील अनुभव, मानवी जीवनातील अनुभव. शेतकरी व्हा, कामगार व्हा, ते जीवन बघा, आणि वादळात फिरायला जा. उंच डोंगर चढा. दऱ्यांत उतरा. सागरात डुंबा. एका चिनी चित्रकाराची गोष्ट आहे. वादळात, मुसळदार पावसात समुद्र कसा दिसतो ते त्याला पहायचे होते. तो समुद्रात कित्येक तास उभा होता. सभोवतीचे वारे, लाटांचे तुषार नि फेस यांची अंगावर वृष्टी होत होती. वरून मुसळधार पाऊस ! आणि तो चित्रकार लाटांत सारखा उभा होता. सर्वांगाचे डोळे नि कान करून पाहात होता, ऐकत होता.

उत्कटतेशिवाय काही नाही. साहस, मोठमोठ्या गोष्टी, विशाल ध्येये, अपार अभ्यास, भरपूर अनुभव, असे करून जीवन सर्व बाजूंनी समृद्ध नि उदात्त करा. तेजस्वी, निर्भय आणि सहानुभूतीचे असे बना.

३) जीवन अनुभवाने समृद्ध करावे याबाबत तुमचे स्वमत मांडा. २

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi
Scanned with CamScan

## विभाग- २ पद्य ( गुण ८ )

**कृती.२पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** ४

योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

१) अ) शुक्राच्या तोऱ्यात म्हणजे ...................... २

अ) शुक्रताऱ्याच्या तेजस्वी प्रकाशात.

आ) शुक्रताऱ्याच्या आकाशी आगमनात.

इ) शुक्रताऱ्याच्या अहंकारीपणात.

ब) .हिरवे धागे म्हणजे ................

अ) हिरव्या रंगाचे कापड.

आ) ताजा प्रेमभाव

इ) हिरव्या रंगाचे गवत

२) अ) सांग धरावा कैसा पारा ! म्हणजे .................... २

अ) पाऱ्यासारखा चकाकणारा

आ) हातातून निसटणारा पारा

इ) पाऱ्यासारखा निसटणारा अनुभव

ब) अभ्रांच्या शोभित एकदा म्हणजे ....................

अ) आकाशात अल्पकाळात शोभून दिसणाऱ्या ढगाप्रमाणे

आ) काळ्या मेघाप्रमाणे

इ) आकाशात धावणाऱ्या ढगाप्रमाणे

| | |
|---|---|
| दवांत आलिस भल्या पहाटीं<br>शुक्राच्या तोऱ्यांत एकदा;<br>जवळुनि गेलिस पेरित अपुल्या<br>तरल पावलांमधली शोभा.<br>अडलिस आणिक पुढे जराशी<br>पुढे जराशी हसलिस;<br>- मागे<br>वळुनि पाहणें विसरलीस का ?<br>विसरलीस का हिरवे धागे ?<br>लक्ष कुठे अन् कुठे पिपासा,<br>सुंदरतेचा कसा इशारा;<br>डोळ्यांमधल्या डाळिंबांचा<br>सांग धरावा कैसा पारा ! | अनोळख्याने ओळख कैशी<br>गतजन्मींची द्यावी सांग;<br>कोमल ओल्या आठवणींची<br>एथल्याच जर बुजली रांग !<br>तळहाताच्या नाजुक रेषा<br>कुणिं वाचाव्या, कुणीं पुसाव्या;<br>तांबुस निर्मल नखांवरी अन्<br>शुभ्र चांदण्या कुणिं गोंदाव्या !<br>दवांत आलिस भल्या पहाटीं<br>अभ्रांच्या शोभेंत एकदा;<br>जवळुनि गेलिस पेरित अपुल्या<br>मंद पावलांमधल्या गंधा.<br>**मर्ढेकरांची कविता....** |

Contact us: @SahajAdhyayan Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.
8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi
Scanned with CamScan

This Question paper shared by Jatin from Raigad Thanks Jatin.



ब) दवांत आलीस भल्या पहाटी या कवितेचे रसग्रहण करा. ४

विभाग- ३ नाटक ( गुण ६ )

कृती.३अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ६

१) भरत मुनीची दोन वैशिष्ट्ये २

२) नाटक आणि अभिनेता यातील संबंध

आ) नाटकाच्या प्रयोगाची सफलता अवलंबून असणारे घटक २

नाटक म्हणजे ............

लेखकाने लिहिलेले नाटक हे कलाकारांनी सादर करायचे असते. चित्र किंवा शिल्प हे घडताच दिसू लागते; पण नाटक हे प्रत्येक वेळी करून दाखवावे लागते. नाटक हे दृक-श्राव्य असल्याने ते लिहिणारे, त्याचा प्रयोग करणारे प्रत्यक्ष अभिनय करणारे, तंत्रज्ञ आणि तो प्रयोग पाहणारे अशा सगळ्यांच्या समन्वयावर आणि सहकार्यावर नाटकाच्या प्रयोगाची सफलता अवलंबून असते. नाटक हा कथा, कादंबरी, कविता याप्रमाणे एक साहित्यप्रकार आहे. यामध्ये अभिनेता किंवा अभिनेत्री अभिनय करत असतात. लेखकाने लिहिलेले संवाद अभिनेत्यांमार्फत प्रेक्षकांपर्यंत पोहोचवले जातात. मुळात नाटक हा दृक-श्राव्य साहित्यप्रकार आहे. ते ऐकता, पाहता व वाचता येते. नाट्यवाचनातून अन्य साहित्यप्रकारांप्रमाणे आपल्याला नाटकाचा आनंद घेता येतो. 'नाटक' रंगमंचावर सादर करता येते.

भारतात प्राचीन काळापासून नाट्यकला अस्तित्वात होती. भरतमुनी यांना भारतीय 'नाट्यकलेचे जनक' असे म्हणतात. 'नाटकाविषयी सखोल माहिती करून देणारा नाट्यशास्त्र हा ग्रंथ त्यांनी लिहिला. त्यांच्या मते, नाटक हे मानवी जीवनातील निरनिराळ्या अवस्थांचे, घटनांचे, प्रसंगाचे, त्यातील वेगवेगळ्या भाव-भावनांचे, वृत्ती-प्रवृत्तीचे व लोकव्यवहारांचे अनुकरण करणारे चित्रण आहे.'

Contact us: @SahajAdhyayan
Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.
8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi
Scanned with CamScanner

'मानवी जीवनात अवतीभोवती घडणाऱ्या अनेक नाट्यमय प्रसंगांतून, घटनांमधून, जाणवणाऱ्या माणसामाणसांतील गुण-अवगुणांमधून त्यांच्यातील भावनांची आंदोलने, वास्तवाधारित परंतु काल्पनिक कथानकात गुंफून, ते उत्तम संवादलेखनातून, दिग्दर्शकाच्या मार्गदर्शनाखाली, कलाकारांच्या अभिनयाद्वारे, तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रंगमंचावर प्रेक्षकांसमोर सादर करणे म्हणजे 'नाटक' होय.'

नाटक हा लेखक, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ यांच्या साहाय्याने रंगभूमीवर सादर होणारा आणि त्याचप्रमाणे नाट्यगृहात समूहाने एकत्रितरीत्या आस्वाद घेता येईल असा कलाप्रकार आहे. नाटक हे जीवनाचे चित्र असते आणि ते कलाकरांच्या माध्यमातून सादर केले जाते. डोळ्यांनी पाहायचे आणि कानांनी ऐकायचे म्हणून ही दृक्-श्राव्य कला आहे. नाटक हे सांघिक कार्य आहे.

इ) नाटक हा वाङ्मयप्रकार इतर वाङ:मय प्रकारांपेक्षा वेगळा आहे. हे विधान तुमच्या शब्दांत ६ ते ८ ओळीत लिहा. २

--- किंवा ---

इ) नाटक म्हणजे सांघिक कलाविष्कार आहे या विधानासंबंधी तुमचे मत लिहा. २

### विभाग- ४ उपयोजित मराठी ( गुण १२ )

कृती.४खालील दिलेल्या कृती सोडवा.

अ) 'वसुंधरा दिनानिमित्त' होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेची कार्यक्रमपत्रिका तयार करा. ६

--- किंवा ---

अ) सूत्रसंचालकाने व्यवस्थित पूर्वतयारी केली. तरच सूत्रसंचालन उत्तम होऊ शकते या विधानाची सत्यता पटवून द्या. ६

आ) मुद्रित शोधन व व्याकरण यांचा सहसंबंध लिहा. ६

--- किंवा ---

आ)मुद्रित शोधकाच्या भूमिकेचे आजच्या काळातील महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा. ६

### विभाग- ५ व्याकरण ( गुण - १२ )

कृती.५अ) खालील वाक्यातील शब्दशक्ती ओळखा. २

१) मी एक लांडगा पाहिला. [ ]

२) मूळ शब्दशक्ती किती आहेत? [ ]

आ)खालील उदाहरणांमधील काव्यगुण ओळखा. २

१) खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे. [ ]

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan
8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi
Scanned with CamScan

This Question paper shared by Jatin from Raigad Thanks Jatin.



२) आता उठवू सारे रान आता पेटवू सारे रान
शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण.

इ) समानार्थी शब्द लिहा. २

१) आई =

२) सावली =

ई) खालील शब्दांमधून उपसर्गघटीत व प्रत्ययघटीत शब्द लिहा. २

रसमय, विस्मृती, सुगंध, निर्दय, निष्ठावंत भावनिक सुशिक्षित, कलावंत.

उ) खालील वाक्यप्रचारांचा योग्य अर्थ लिहा. २

१) तोंडात बोट घालणे -

अ) आश्चर्य व्यक्त करणे

ब) आश्चर्य नसणे

क) आश्चर्याबद्दल काही न वाटणे

२) तोंडात मूग धरून बसणे -

अ) गप्प बसणे

ब) काहीही बोलणे

क) गप्पा मारणे

ऊ)खालील शब्द शुद्ध लिहा. २

१) वंसत -

२) ओजंळ -

३) सुरर्य -

४) स्पर्श -

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi
Scanned with CamScan